# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०३/२०२५ (मंगळवार) दुपार**

## मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांची काटोल येथील मशीदींना भेट

आज दिनांक ११/०३/२०२५ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी आगामी होळी,धुलीवंदन आणि रमजान ईद सण असल्याने पोलीस स्टेशन काटोल येथे भेट दिली. सदर भेटी दरम्यान मा पोलीस अधिक्षकांनी रमजान महिन्यातील शुक्रवार नमाज संबंधाने पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत १) जंगल शहावली बाबा दर्गा फल्ली मार्केट ,२)शहर मशीद हत्तीखाना, ३) जामा मशीद पेठ बुधवार,४) हैदरी मशीद ,रेल्वे स्टेशन येथे भेटी दिल्या. त्यावेळी त्यांनी रमजान ईद च्या दिवशी लावण्यात येणाऱ्या बंदोबस्त संबंधाने योग्य मार्गदर्शन व सूचना दिल्या.सदर वेळी मा पोलीस अधिक्षकांनी मुस्लीम बांधवासोबत सुध्दा चर्चा केली.सदर भेटी दरम्यान श्री बापु रोहोम,उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल उपविभाग, काटोल आणि श्री निशांत मेश्राम, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन काटोल असे हजर होते.




हबीब अली शाह






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर